सोमवार दि.२५ डिसेंबर २०२३
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : १२४
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com

# नामदार संजय बनसोडे क्रीडा मंडळाच्या बोधचिन्हाचे क्रीडा मंत्री ना.संजय बनसोडे यांच्या हस्ते अनावरण

## १४ ते २० जानेवारीपासुन डे - नाईट राष्ट्रीय फुटबॉल स्पर्धा

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**सुनिल बस्वराज हावा**

उदगीर- मंत्री चषक २०२४ अखिल भारतीय डे - नाईट फुटबॉल स्पर्धा येत्या १४ ते २० जानेवारी २०२४ मध्ये तालुका क्रीडा संकुल जिल्हा परिषद येथे पार पडणार आहे. या स्पर्धेत देशातील नामवंत संघ सहभागी होणार आहेत. याच धर्तीवर नामदार संजय बनसोडे क्रीडा मंडळाच्या वतीने क्रीडा मंडळाचा बोधचिन्ह (लोगो) चे अनावरण राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. संजय बनसोडे यांच्या शुभ हस्ते शासकीय विश्रामगृह , उदगीर येथे करण्यात आले.






गेल्या काही महिन्यापासून उदगीर परिसरातील खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असुन महाराष्ट्र राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्रालायचा नामदार संजय बनसोडे यांनी पदभार स्वीकारल्यापासून मतदार संघातील क्रीडा प्रकल्प व विविध सामन्यांचे आयोजन सातत्याने होत आहे नोव्हेंबर महिन्यापासुन उदगीरमध्ये राज्यस्तरीय फुटबॉल, डॉज बाल सह विविध स्पर्धांचे यशस्वी आयोजन करण्यात येत आहे. जानेवारी - २०२४ मध्ये राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. तर १४ ते २० जानेवारी २०२४ या कालावधित 'मंत्री चषक' अखिल भारतीय डे - नाईट स्पर्धा आयोजीत करण्यात आल्या आहेत. या स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक २,०७१,१११/- रोख रक्कम व सन्मान चिन्ह व्दितीय पारितोषिक १,७१,१११/- रोख रक्कम व सन्मान चिन्ह , तिसरे पारितोषिक ४१,१११/- व रोख रक्कम व सन्मान चिन्ह , तर चौथे पारितोषीक ३१,१११ रोख व सन्मानचिन्ह तसेच मॅन ऑफ दि सिरीज, बेस्ट गोलकीपर, बेस्ट डिफेंडर, बेस्ट फारवर्ड, बेस्ट मिड फिल्डर यांना सन्मानचिन्ह आणि प्रत्येकी ५०००/- रुपये रोख व प्रत्येक सामन्यातील मान ऑफ दि मॅच यास ११००/- रोख रक्कम देण्यात येणार आहे. यावेळी क्रीडा मंडळाचे अध्यक्ष शेख फय्याज, उपाध्यक्ष शेख निझाम,सलीम परकोटे कार्याध्यक्ष, बाळसाहेब मारलापल्ले, समन्वयक अहमद सरवर , सचिव शेख इफ्तेखार, सह सचिव अनिल मुदाळे, परवेज खाद्री, मंडळाचे मार्गदर्शक समीर शेख,सदस्य प्रवीण भोळे, प्रा.शाम डावळे,सय्यद जानिमियां, शेख अतिक, शेख, यासेर शेख,फुर्खान रिझवान,महबूब मुल्ला, इब्राहीम कुरेशि,अरबाज अस्फी,अखीब शेख, शेख अब्दुल समद, आदीसह क्रीडा मंडळाचे पदाधिकारी व खेळाडू उपस्थित होते.

# गोपाळ सामाजहित महासंघाच्या कार्याध्यक्षपदी नंदकुमार पवार


**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**दौंड:( बबनराव धायतोंडे):**

गोपाळ समाजहित महासंघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने छत्रपती संभाजीनगर येथे दि.२४ रोजी मनोमिलन तथा राज्य कार्यकारणी पुनर्गठन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळीअध्यक्ष पदी संजय गव्हाणे, उपाध्यक्ष पदी संतोष मोरे, कार्याध्यक्षपदी नंदकुमार पवार, सचिव पदी शेकूराव वाणी व कोअर कमिटी सदस्य यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.



पुरोगामी समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्यात भटक्या विमुक्त जाती जमातींच्या लोकांना स्वातंत्र्याची ७३ वर्ष उलटून देखील अन्याय अत्याचाराला सामोरे जावे लागत आहे. विविध भटक्या विमुक्त जाती जमाती संघटनेच्या माध्यमातून गोपाळ समाजातील नंदकुमार पवार हे बऱ्याच वर्षांपासून समाजासाठी काम करत आहेत. कुटुंबातील गरीब परिस्थितीतुन शिक्षण पूर्ण केले असून पवार हे विखुरलेल्या समाजाला संघटीत करून समाजहिताचे कार्य मोठ्या जोमाने करत आहे यापूर्वी त्यांनी पुणे जिल्ह्याचे अध्यक्ष पद, तसेच प्रदेशाध्यक्ष पद देखील भूषवले आहे.भटक्या विमुक्त जातीसाठी अनेक आयोग नेमले गेले त्या त्या आयोगाने केंद्र सरकाकडे शिफारशी देखील पाठवल्या परंतु आजपर्यंत कोणत्याही सरकारने भटक्या विमुक्तांसाठी आयोग लागू केला नाही व आयोगाच्या शिफारशी देखील लागू केल्या नाहीत. परिणामी आजही भटक्या विमुक्तांचे जीवन हे कसरतीचे आहे. सर्वप्रथम यासाठी मी हे काम हाती घेणार असून येणाऱ्या काळामध्ये समाजासाठी विविध उपाय योजना व समाज कसा घडेल या दृष्टीने काम करणार आहे असा ठाम विश्वास यावेळी नंदकुमार पवार यांनी बोलताना व्यक्त केला. यावेळी माजी राज्य अध्यक्ष सुभाष गव्हाणे, उपाध्यक्ष गोविंद गव्हाणे, सचिव भरत गव्हाणे, संपर्क प्रमुख संजय भोसले, मारुती गव्हाणे, गोपाल तागड, राजू गव्हाणे, आंबदास वाणी, शेषराव मोरे, बालाजी घोडके, देवेंद्र धनगरे, रविभाऊ गव्हाणे, शांताराम गायकवाड, बबन वाणी, शंकर कालापाड, विजय महाजन आदी उपस्थित होते.

# तीस वर्षापासून रखडलेल्या रस्त्याचे भूमिपूजन शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख देशमुख यांच्या हस्ते उद्घाटन



**लोकनेता न्युज नेटवर्क**
**सेनगाव ( महादेव हारण)**

सेनगाव शहरातील प्रभाग क्रमांक दोनच्या नगरसेविका श्रीमती यमुनाबाई नारायणराव देशमुख यांच्या प्रयत्नातून गेले ३० वर्षापासून रखडलेल्या रस्त्याच्या कामाचे आज भूमिपूजन करण्यात आले यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख संदेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सेनगाव नगरपंचायत अंतर्गत प्रभाग क्रमांक दोन मधील रस्त्याच्या बांधकामाचे आज भूमिपूजन करण्यात आले असून यावेळी सेनगाव नगर अध्यक्ष सो गायत्री देशमुख उपनगराध्यक्ष निखिल देशमुख शिवसेना शहर प्रमुख तथा नगरसेवक जगदीश देशमुख मा चेअरमन रामरावजी देशमुख पंजाबराव देशमुख नगरसेवक वैभव देशमुख खुशाल हराळ यादव वायसे संतोष शिर्के अविनाश खताळ दत्ता शिर्के विलास गोडसे प्रकाश गोडसे महेश लोटे व प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते गेल्या अनेक वर्षांपासून या रस्त्याचे काम रखडल्याने आज नागरिकाकडून मोठ्या थाटामाटात भूमिपूजन करण्यात आले.

# शिक्षण प्रसारक मंडळ चिखली द्वारा आयोजित क्रीडा महोत्सव संपन्न

**लोकनेता न्युज नेटवर्क । देऊळगाव राजा**

दीनदयाल विद्यालय व कनिष्ठ कला आणि विज्ञान महाविद्यालय दे.राजा जि बुलढाणा येथे बुधवार दिनांक २० डिसेंबर २०२३ रोजी यावर्षीचा शिक्षण प्रसारक मंडळ चिखली द्वारा आयोजित क्रीडामहोत्सव आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास बरोबरच शारीरिक विकास व्हावा यासाठी हा क्रीडामहोत्सव आयोजित करण्यात आला होता.महोत्सवात संस्थेंतर्गत एकुण दहा शाळा सहभागी झाल्या होत्या,एकूण ५४१ खेळाडू सहभागी झाल्याचे दिसून आले.प्रामुख्याने कबड्डी,खोखो,लांब उडी,गोळा फेक,१००/२००/४००मी धावणे इत्यादी खेळांच्या १४,१७,१९ वर्षे वयोगटातील खेळाडूंच्या स्पर्धा पार पडल्या या क्रीडामहोत्सवाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मा. रामकृष्णदादा शेटे,उद्घाटक म्हणुन सचिव मा.प्रेमराजसेठ भाला,संचालक अशोक भाऊ कोटेचा,अरविंदभैय्या शिंगणे,पुरुषोत्तमभाऊ



धन्नावत, बाबासाहेब मिनासे,व्यवहारे दादा, जिल्हा क्रीडा अधिकारी बाळकृष्ण महानकर साहेब यांच्यासह संस्थेचे सर्वपदाधिकारी, दे.राजा पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी मा. मुसदवाले साहेब,प्राचार्य एस. बी. गारडे सर, प्राचार्य शेळके सर, प्राचार्य जाधव सर, प्राचार्य बारापात्रे सर यांच्यासह पर्यवेक्षक एस.एन.व्यास सर तसेच विविध दहा शाळांचे शारीरिक शिक्षक, सोबतच मदतीसाठी जबाबदार शिक्षक तथा शिक्षकेत्तर कर्मचारी बंधू भगिनी उपस्थित होत्या. महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना मा.सचिव साहेब यांनी महोत्सवाचा उदात्त हेतू स्पष्ट करून मार्गदर्शन केले,प्राचार्य श्री. एस. बी गारडे सर यांनी विद्यार्थ्यांनी खेळाडू वृत्ती अंगी बनवावी असे सांगितले तर मा. गटशिक्षणाधिकारी श्री. मुसदवाले साहेब यांनी खेळांच्या माध्यमातून कसे करिअर करता येईल या बाबत मार्गदर्शन केले.अध्यक्षीय भाषणात मा.रामकृष्णदादा शेटे यांनी खेळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपला शारीरिक करून घ्यावा असे सांगितले तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी मा.बालकृष्णन महानकर साहेब यांनी विद्यार्थ्यांनी मोबाईल गेम मधून बाहेर पडून मैदानी खेळ खेळावे असे प्रतिपादन केले.या संपुर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.श्री.एस.डब्ल्यू. सस्ते यांनी केले तर क्रीडामहोत्सवाचे प्रमुख या नात्याने श्री.आर.एल.राठोड सर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## अधिकारी हप्ते खावून हिमालयात गेल्याचे संकेत

# रेती घाटामधील भ्रष्टाचार आमरण उपोषणाकडे अधिकार्यांचे दुर्लक्ष

**लोकनेता न्युज नेटवर्क**
**सिंदखेड राजा(ज्ञानेश्वर बुधवत)**

तालुक्यातील निमगांव वायाळ येथे शासनाच्या आदेशाने रेती घाट सुरू करण्यात आला असून या रेती घाटातून शासनाचे सर्व नियम अटी व शर्ती पायदळी तुडवून केवळ ठेकेदाराचे हितसाध्य करण्यासाठी महसूल विभागाच्या कर्मचार्यांसोबत संगणमत करूण शासनाचे लाखो रूपायाचे महसूल बुडविण्याचे काम सुरू असल्याने सदर ठेकेदारावर कारवाई करून रेती घाटातील भ्रष्टाचार थांबविण्यासाठी देवानंद मुरलीधर सपकाळ हे २२ डिसेबर पासुन तहसिल कार्यालया समोर उपोषणास बसले असून या उपोषणाकडे महसूल अधिकारी दूर्लक्ष करीत असल्याचा आरोप उपोषण कर्त्यांनी बोलताना केला. उपोषण करते सपकाळ यांनी बोलताना सांगितले दोन



दिवसात महसूल कर्मचारी यांनी उपोषण ठिकाणी भेट दिली नसून अद्याप वैद्यकीय सेवेतील डॉक्टर हे पण माझ्या तब्येत पाहण्यासाठी आले नाही. सदर ठेकेदार यांनी निमगाव वायाळ रेतीघाटातुन अंदाधुंद रेती उपशामुळे गावातील नागरिकांची पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ चालून येणार असल्याने या प्रकरणी सर्वस्वी महसूल विभाग जबादार राहील तसेच सदर येथे घाटावर वाद होउन कायदा व सु व्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याला तहसीलदार जबाबदार राहील तसेच सदर रेती घाटावर रेती भरण्यासाठी पोकल्यांडचा वापर न करता मजुरांचा वापर करावा या घाटातील प्रत्येक क्षणाला सीसीटीव्ही कायमस्वरूपी सुरू ठेवून त्याचा अहवाल तक्रार दारात देण्यात यावा या मागणीसाठी देवानंद सपकाळ यांनी उपोषण सुरू केले आहे.

### चारोळी

भेदून तिमिराला
कळी हळूच उमलत जाते
हरवून जाते देहभान
अन सुगंध उधळत राहते.

रंजना सानप
मायणी (सातारा)

# महाराष्ट्राची शान 'लावणी' उत्तम सादर करत डॉ.रेणू जोशी यांनी महाराष्ट्राची शान कायम राखली

**लोकनेता न्युज नेटवर्क । देऊळगाव मही**

दि.१७ रोजी विजया शांती लॉन, पेट्रोल पंपासमोर, देऊळगाव मही, ता. देऊळगाव राजा जि. बुलढाणा येथे १३ वे झेप साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले होते. यामध्ये प्रमुख आकर्षण होते सुप्रसिध्द सिनेअभिनेत्री, नृत्यदिग्दर्शिका व लेखिका म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या डॉ.रेणू जोशी यांचा नृत्याविष्कार. त्यांनी ' विडा रंगला ओठी' ही बैठकीची लावणी 'कशी असावी ' याच उत्तम उदाहरण देत सादर केली. लावणीबद्दल सांगायचे झाल्यास,एकीकडे महाराष्ट्राची शान समजली जाणारी लावणी, दुसरीकडे मात्र हीच लावणी अंगविक्षेप करून सादर करत महाराष्ट्राची शान धोक्यात आणणाऱ्या काही 'नृत्यांगना ' असताना आज बऱ्याच वर्षानंतर बघायला मिळालेली अस्सल पारंपरिक लावणी सादर करत डॉ.रेणू जोशी यांनी महाराष्ट्राची शान कायम राखली आहे पदन्यास,तोडा,अभिनय, शृंगार,अर्थपूर्ण सादरीकरण ,चेहऱ्यावरील हावभाव इ काय असतं ,हे लावणी मधून प्रेक्षकांच्या मनाला जाऊन भिडणार सादरीकरण.डॉ.रेणू जोशी म्हणतात, आजच्या काही तरुणी बीभत्स, अंगविक्षेप करत मूळ कलाप्रकार बाजूला ठेवून त्याला वेगळच वळण देत प्रेक्षकांसमोर चुकीचा आदर्श ठेवत आहे.हे येणाऱ्या पिढीसाठी संस्कृतिकदृष्ट्या फार घातक आहे.हे तेव्हाच थांबेल जेव्हा आपण हा विचार करू की , ' लोकांना हवं तस आवडेल असं सादरीकरण देवूया ,ऐवजी ' आपण अस्सल कलाप्रकार सादर करूया यातून प्रेक्षकांची आवड नक्कीच बदलेल.' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला .या संमेलनात माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य मा. आ. राजेंद्रजी शिंगणे साहेब, जेष्ठ समीक्षक व साहित्यिक डॉ.ऋषिकेश कांबळे सर, झेप चे प्रमुख श्री डी. एन. जाधव सर यांच्या हस्ते मातोश्री हरणाबाई जाधव पुरस्काराने गौरविण्यात आले.यावेळी मंचावर संमेलनाध्यक्ष मा.डॉ.ऍड.विजयकुमार कस्तुरे सर,स्वागताध्यक्ष श्री कडुबा बनसोडे सर, श्रीमती ए. बी. साळवे मॅडम, डॉ.सावली राऊत मॅडम आदींची उपस्थिती होती. यावेळी महाराष्ट्रातील मान्यवर साहित्यिकांची या १३ व्या झेप साहित्य संमेलनाला उपस्थिती होती.

# संपादकीय

## शाळेच्या वेळेबाबत वेळीच जागे व्हा!



मुलांची झोप पूर्ण होत नसल्याने शाळेच्या वेळा पुढे ढकलण्याची सूचना राज्यपालांनी केली. हा बदल केल्यास होणाऱ्या अनिष्ट परिणामांकडे लक्ष वेधणारा लेख.महाराष्ट्राच्या राज्यपालांनी शाळेच्या वेळेबाबत केलेल्या सूचनेवरून सध्या राज्यातील शैक्षणिक वर्तुळात जोरदार चर्चा सुरु झाली आहे. अलीकडच्या काळात बदलत्या जीवनशैलीमुळे मुलांचे रात्रीचे जागरण वाढत असल्याने ते उशिरा झोपतात व सकाळी भरणाऱ्या शाळांमुळे त्यांना लवकर उठावे लागत असल्याने त्यांची पुरेशी झोप होत नाही.त्याचा त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेता, शाळांची वेळ बदलून उशिरा ठेवावी, अशी सूचना राज्यपालांनी केली आहे. विद्यार्थ्यांचे आरोग्य उत्तम रहावे, ही यामागची भावना असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, राज्यपाल महोदयांची सूचना अवास्तव, अव्यवहार्य आहे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.याचे कारण म्हणजे, विद्यार्थ्यांच्या आरोग्याची जोपासना करायची असेल तर त्यांनी रात्री लवकर झोपावे आणि सकाळी लवकर उठावे, असे भारतीय संस्कृती, आणि आयुर्वेद सांगते.विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ राहण्यासाठी सकाळी लवकर उठून योग आणि अभ्यास करणे हितावह असल्याचे वेद आणि पुराणांमध्ये सांगितले आहे. आयुर्वेदानुसार सकाळी ब्रह्ममुहूर्तावर उठणे अत्यंत आरोग्यदायी असून सकाळी मोठ्या प्रमाणात मिळणाऱ्या प्राणवायूमुळे शरीर आणि मन ताजेतवाने राहते. तसेच शरीराची प्रतिकारशक्ती वाढून ते निरोगी राहण्यास मदत होते. तसेच, सकाळी लवकर उठून केलेला योग दुर्धर व्याधींवर रामबाण उपाय मानला जातो.विद्यार्थ्यांचे शारीरिक स्वास्थ्य लक्षात घेता, सकाळी लवकर उठणे आवश्यक असून किमान शाळेच्या वेळांमुळे तरी ते लवकर उठतात. सकाळच्या नैसर्गिक वातावरणाचा प्रत्यक्ष- अप्रत्यक्ष लाभ त्यांना मिळतो. शाळेच्या वेळा उशिरा ठेवल्यास शाळकरी मुले अधिक आळशी बनून आरोग्यदृष्ट्या आणखी दुर्बल होतील, अशी शक्यता नाकारता येत नाही.दुसरीकडे, शाळेच्या वेळा ह्या नियमित कार्यालयीन वेळेपेक्षा वेगळ्या ठेवण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, वाहतूकव्यवस्थेचे नियोजन हे होय. शाळेच्या वेळा आणि कार्यालयीन वेळा वेगवेगळ्या ठेवल्याने एकाच वेळी वाहतूकव्यवस्थेवर येणारा ताण कमी होण्यास मदत होते. याउलट शाळा आणि कार्यालयीन वेळा सारख्या केल्यास रस्त्यांवरील वाहतूक वाढून वाहतूक कोंडी आणि अपघातांचे प्रमाण वाढण्याचा धोका अधिक आहे.त्यामुळे शाळा आणि कार्यालयीन वेळा यांत अंतर असणे गरजेचे आहे. तसेच, शाळा आणि कार्यालयीन वेळा भिन्न ठेवण्याचे दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे वीजवापराचे नियोजन हेही आहे. शाळा आणि कार्यालयीन वेळा सारख्या ठेवल्यास एकाच वेळी विजेचा मागणी वाढल्याने विजेची टंचाई वाढू शकते. त्यादृष्टीने वीजवापरात सुरळीतपणा आणण्यासाठी शाळा आणि कार्यालयीन वेळा यांत अंतर ठेवले जाते. याबाबींचा विचार करता, शाळेच्या वेळा ह्या कार्यालयीन वेळेपेक्षा भिन्न असणे गरजेचे आहे.वास्तविकत: अलीकडील काळात लोकांच्या जीवनशैलीत आमूलाग्र बदल होत आहेत. मोबाईल आणि इंटरनेटचा अतिवापर वाढल्यामुळे रात्री उशिरापर्यंत जागरण वाढत आहे. इंटरनेट, मोबाईल आणि सामाजिक माध्यमांत पालकांनी स्वत:ला इतके गुंतवून घेतले आहे की, रात्रीचे बारा आणि एक कधी वाजतात हे पालकांच्याही लक्षात येत नाही. तर पालक उशिरापर्यंत जागे राहिल्याने मुलेही उशिरापर्यंत जागे राहतात, हे खरे.सकाळी लवकर शाळा असल्याने मुलांना लवकर उठावे लागते. त्यामुळे त्यांची पुरेशी झोप होत नाही, हा राज्यपालांचा दावा खरा असला तरी, रात्री उशिरापर्यंत जागरण करणे हेच मुळात निसर्ग आणि आयुर्वेदाच्या विरुद्ध आहे. विशेष म्हणजे रात्री उशिरापर्यंत होणारे जागरण उत्पादक की अनुत्पादक याचा विचार करता, ते अनुत्पादक स्वरुपाचेच अधिक आहे, हे समोर येते. मग यात शाळेच्या वेळेचा काय दोष?त्यामुळे रात्रीचे अनुत्पादक जागरण, मुलांची न होणारी झोप आणि त्याचे आरोग्यावर होणारे विपरीत परिणाम लक्षात घेता, पालकांनी स्वत:ला शिस्त लावून रात्रीच्या जागरणावर मर्यादा आणणे अधिक आवश्यक आहे. त्यादृष्टीने रात्रीच्या टीव्ही, मोबाईल, इंटरनेट वापरावर काही मर्यादा आणता येतील का, याचा खऱ्या अर्थाने विचार होणे अधिक योग्य राहील. शाळेच्या वेळा बदलण्यामुळे विद्यार्थी अधिक आळशी होऊन शैक्षणिक कामगिरीवर विपरीत परिणाम होऊ शकतो. याचा गांभीर्याने विचार व्हायला हवा.

# सायबर हल्ल्याचा इशारा



पश्चिम रेल्वेच्या लोअर परळ वर्कशॉपमधील 'ऑटोमॅटिक स्टोअरेज रिट्रिव्हल सिस्टिम'वर (एएसआरएस) झालेल्या सायबर हल्ल्याने सार्वजनिक सेवेतील सायबर सुरक्षेच्या त्रुटी पुन्हा उघड झाल्या. रेल्वे देखभाल-दुरूस्तीसाठी सुटे भाग पुरविणाऱ्या यंत्रणेवर झालेल्या हल्ल्याने हे कामकाज विस्कळित झाले. एखाद्या अन्य महत्त्वपूर्ण यंत्रणेवर हा हल्ला झाला, तर एखादा अनुचित प्रसंग उद्भवण्याचीही भीती लक्षात घेऊन या प्रकरणी तातडीने पावले उचलली पाहिजेत.लोअर परळमधील या १४० वर्षांपासून कार्यरत असलेल्या विभागात रेल्वे यंत्रणेच्या देखभाल दुरूस्तीचे काम चालते. प्रवाशांचे रेल्वेवरील अवलंबन पाहता या विभागावर कामाचा मोठा ताण आहे. या तातडीच्या कामांसाठी आवश्यक साहित्य व सुटे भाग मिळविणे व संबंधितांना पुरविणे यामध्ये जाणारा वेळ वाचविण्यासाठी सन २०१९ मध्ये साडेअकरा कोटी रुपये खर्च करून 'एएसआरएस' ही ऑनलाइन यंत्रणा सुरू झाली. त्यामुळे ही सर्व प्रक्रिया सुलभ झाली. मात्र, काही दिवसांपूर्वी चोरट्यांनी या यंत्रणेवर सायबर हल्ला करून खंडणी मागितल्याची माहिती आहे. यामुळे संपूर्ण यंत्रणा विस्कळित झाली असून पुन्हा पूर्वीप्रमाणे कर्मचाऱ्यांमार्फत कामकाज चालू आहे.

डिजीटल आरोग्य परिसंस्थेच्या मदतीने मधुमेहाच्या व्यवस्थापनामध्ये घडलेली क्रांतीकदाचित, या व्यवहारांमध्ये पारदर्शकता आल्याने कोणाचे हितसंबंध दुखावले असण्याचीही शक्यता तपास यंत्रणा पडताळून पाहतीलच. यापूर्वीही प्रवाशांची माहिती सार्वजनिक होण्यासारखे सायबर हल्ले रेल्वेच्या विविध यंत्रणांवर झाले आहेत. रोज धावणाऱ्या सुमारे १४ हजार रेल्वेगाड्यांद्वारे सव्वादोन कोटी प्रवासी प्रवास करतात, त्या रेल्वेची सेवा सुलभ होण्यासाठी आधुनिकीकरण आणि नव्या तंत्रज्ञानाचा वापर, ही अपरिहार्य गोष्ट आहे. त्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर वाढत असल्याने अनेक समस्या सुटत असल्या, तरी या यंत्रणेच्या सुरक्षिततेची आव्हाने उभी राहत आहेत.रेल्वेच्या या ऑनलाइन सेवांचा लाखो प्रवासी वापर करतात, त्यामुळे सर्वाधिक वापरकर्ते असलेल्या या यंत्रणांकडे सायबर चाच्यांचेही साहजिकच लक्ष जाते, हा जगभरातील अनुभव आहे. रेल्वे सिग्नल, ऑनलाइन तिकीट प्रणाली, प्रवासी माहिती सेवा, वाहतूक नियंत्रण अशा कळीच्या विभागांना लक्ष्य करून गोंधळ उडवून देण्याचा त्यांचा उद्देशही सफल होतो, हे लक्षात घेऊन या यंत्रणांसाठी भक्कम सुरक्षा व्यवस्था उभारणे आवश्यक आहे. नव्या यंत्रणा उभारल्यानंतर विघातक प्रवृत्तीही त्यात पळवाटा शोधतात, त्यांवर नियंत्रण मिळविणे, ही सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे. सरकारमधील कुप्रसिद्ध लालफितशाही या सुधारणांच्या आड येऊ नये.

# चौथ्या खेपेतील काथ्याकूट

विरोधकांच्या इंडिया आघाडीची चौथी बैठक राजधानीत अशोक हॉटेलमध्ये पार पडली. मात्र, दिवसागणिक जवळ येत चाललेल्या लोकसभेच्या निवडणुकांसाठी विरोधकांची नेमकी रणनीती, किमान समान कार्यक्रम आणि जागावाटप ठरले का, या प्रश्नांची उत्तरे मिळालेली नाहीत.



केंद्रात भारतीय जनता पक्षाला पर्याय देण्यासाठी एकत्र आलेल्या देशातील २८ विरोधी पक्षांच्या प्रतिनिधींची चौथी बैठक राजधानीत अशोक हॉटेलमध्ये पार पडली. मात्र, दिवसागणिक जवळ येत चाललेल्या लोकसभेच्या निवडणुकांसाठी विरोधकांची नेमकी रणनीती, किमान समान कार्यक्रम आणि जागावाटप ठरले का, या प्रश्नांची उत्तरे मिळालेली नाहीत. २२ तारखेला विरोधक देशभरात निदर्शने करणार आहेत. संसदेतून विरोधकांचे जे खासदार निलंबित करण्यात आले; त्याच्या विरोधात ही निदर्शने असतील. हे पाऊल अगदी योग्य आहे. मात्र, अशी प्रतिक्रियात्मक आंदोलने करण्याऐवजी ठोस कार्यक्रम घेऊन विरोधक जनतेकडे एकत्रित ताकदीने कधी जाणार? शिवसेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी 'इंडिया आघाडीचा निमंत्रक तरी निदान आत्ता ठरवा', अशी महत्त्वपूर्ण सूचना केली होती. तीही ज्येष्ठांनी कानाआड केली.'निमंत्रक होतो, तोच सर्वमान्य नेता होतो असे नाही,' असा खुलासाही ठाकरे यांनी केला होता. याचे कारण, उद्या विरोधकांना समजा बहुमत मिळालेच तर पंतप्रधान कोण होणार, याचे उत्तर शोधावेच लागेल. इतके दिवस काँग्रेसच्या विरोधात सतत तारस्वरात तक्रारी करणाऱ्या पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि दिल्लीचे चतुर मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांचे नाव पंतप्रधानपदासाठी 'इंडिया'ने जाहीर करावे, असे सुचविले. ते अर्थातच सर्वमान्य झाले नाही. तशी घोषणाही होऊ शकली नाही. खुद्द खरगे यांनी पत्रकार परिषदेत 'आधी जास्तीत जास्त खासदार निवडून आणू या आणि मग नेतेपदाचे ठरवू या,' अशी भूमिका घेतली. बिहारचे लढवय्ये नेते नितीश कुमार आणि लालूप्रसाद यांना ममतांचा हा अती उत्साह पसंत पडला नाही. ती नाराजी त्यांनी दिल्लीतून लवकर काढता पाय घेऊन दाखवून दिली. नितीश कुमार यांनी पुन्हा राजकीय लांब उडी मारायची नसेल, तर लालूंना त्यांना पकडून ठेवावेच लागेल. त्यामुळे, दोघांनी संयुक्त त्रागा केला. मात्र, खरगे यांचे नाव काँग्रेसचे मुखिया असणाऱ्या गांधी परिवाराला तरी मान्य आहे का, याचे उत्तर मिळालेच नाही. खरगे अध्यक्ष होऊन इतके दिवस झाले, तरी त्यांना अजून मनाप्रमाणे पक्ष चालविता येत नाही. मग बाकीचे काय?तीन राज्यांमध्ये काँग्रेसचा सणसणीत पराभव झाल्याने विरोधकांचे ऐक्य सोपे होईल, अशी आशादायी कुजबूज बैठकीच्या आत-बाहेर चालू होती. मात्र, विरोधकांचे प्रामाणिक ऐक्य आणि जागावाटप व्हायचे असेल, तर सन २०१९मध्ये लढलेल्या किमान शंभर जागा काँग्रेसला सोडून द्याव्या लागतील. त्या मित्रपक्षांना द्याव्या लागतील. काँग्रेस याला तयार आहे का? एव्हाना राज्य पातळीवर विरोधकांनी एकत्र येऊन जागावाटपाचा फॉर्म्युला निश्चित करायला हवा होता. तसे झालेले नाही. उत्तर प्रदेशात समाजवादी पक्ष, बिहारमध्ये नितीश आणि लालू यांचे पक्ष, बंगालमध्ये तृणमूल काँग्रेस, केरळमध्ये डावे पक्ष या साऱ्यांसाठी काँग्रेस चार पावले मागे यायला तयार आहे का? महाराष्ट्राचेच उदाहरण घेतले तर ४८ मतदारसंघातील काँग्रेस, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात कसे वाटप होणार आहे, याचा काहीच सुगावा अद्याप नाही. बाळासाहेब आंबेडकर यांच्या पक्ष-संघटनांना कसे सामावून घेणार, याचे अद्याप काही सूत्र नाही. मग प्रत्यक्ष लढाईची तयारी कधी होणार आणि ती ताकदीने कशी लढणार?मल्लिकार्जुन खरगे हे दलित आहेत. देशाने बाबू जगजीवनराम यांच्या रुपाने पहिला दलित पंतप्रधान मिळण्याची संधी दोनदा गमावली होती. त्यामुळे आता सामाजिक न्यायाच्या दृष्टीने असा उमेदवार देणे, ही चांगली राजकीय खेळी होऊ शकते. मात्र, ती सर्वांनी मिळून एकदिलाने करायला हवी होती. त्यांना नेतेपद द्यायचे नसेल, तर निदान आघाडीचे निमंत्रक तरी करायला हवे होते. संसदेत झालेल्या घुसखोरीचा संबंध राहुल गांधी यांनी बेरोजगारीशी आणि अस्वस्थ तरुणाईशी जोडला होता. असे असेल तर 'इंडिया' आघाडीने मोदी सरकारच्या आर्थिक धोरणांना पर्याय देणारा किमान समान कार्यक्रम, जाहीरनामा तयार करून एव्हाना प्रकाशित करायला हवा होता. देशभरात नाराज तरुणांच्या आंदोलनांची राळ उडवून द्यायला हवी होती. पण भारतीय राजकारणात जेते जितके अहंकारग्रस्त असतात; तितकेच अहंकारी पराजितही असतात. आपापल्या राज्यात शेर असणारे नेते राष्ट्रीय पातळीवर आपली उडी किती, याचा विचारही करत नाहीत. मध्य प्रदेशात काँग्रेसने सोबत घेतले नाही म्हणून अखिलेश यादव यांनी बराच त्रागा केला होता. प्रत्यक्षात त्यांना स्वतंत्रपणे अर्धा टक्काही मते मिळवता आली नाहीत. आपापली मर्यादा न ओळखता हे २८ पक्ष असेच दर काही दिवसांनी केवळ काथ्याकूट करीत बसतील, तर हा हा म्हणता लोकसभेची निवडणूक दारात येऊन ठेपेल. तेव्हा लटकेच हसून काढून घेतलेले गळामिठ्यांचे फोटो वाचविणार नाहीत. या फोटोंचे नंतर केवळ अल्बम बघत बसण्याची वेळ येईल.

# राज्यातील अनेक जिल्ह्यांत थंडीची लाट:आणखी काही दिवस थंडी कायम, नाताळनंतर थंडीत आणखी वाढ होण्याची शक्यता

**पुणे**-राज्याततील अनेक भागात तापमानाचा पारा घसरला आहे. हवामानातील बदलांमुळे सध्या महाराष्ट्र चांगलाच गारठला आहे. महाराष्ट्रात आठवडाभर कोरडे वातावरण राहणार आहे. तर आणखी आठवडाभर थंडी कायम राहण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. नाताळच्या वेळी तापमानात किंचित वाढ होणार आहे. मात्र त्यांनतर पुन्हा तापमानात घट होऊन थंडी वाढण्याची शक्यता आहे.सोमवारपासूनच राज्यात थंडीचा कडाका वाढला आहे. विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्रात गारठा कायम आहे. पहाटे आणि रात्री थंडी जाणवत आहे. याशिवाय याठिकाणी तापमानाचा पारा देखील घसरला आहे. तर आज (ता. २१) विदर्भासह राज्यात गारठा कायम राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.राज्यात हळूहळू तापमानाचा पारा घसरत आहे. विदर्भातील सर्वच जिल्ह्यांमधील किमान तापमान १२ अंशाखाली गेले आहे. त्यामुळे थंडी वाढली आहे. विदर्भातील



यवतमाळ, चंद्रपूर, गोंदिया, नागपूर, वाशिममधील किमान तापमानात मोठी घट झाली आहे. त्यामुळे ठिकठिकाणी शेकोट्या पेटल्या आहेत.मुंबईत मात्र थंडी काहीशी कमी झाली आहे. गेल्या आठवड्यात शहराचे तापमान २० अंश सेल्सिअसच्या खाली गेले होते. मात्र सोमवारपासून मुंबईच्या किमान तापमानात ३ ते ४ अंशांनी वाढ झाली आहे. भारतीय हवामानशास्त्र विभागनुसार, २५ डिसेंबरनंतर मुंबई आणि उपनगरात पुन्हा तापमानात घट होण्याची शक्यता आहे.अरबी समुद्रात चक्रीवादळ निर्माण झाले आहे. याचा परिणाम देशासह राज्याच्या हवामानावर होताना दिसत आहे. आता काही दिवस तापमानात वाढ होताना दिसेल. मात्र, २५ डिसेंबरनंतर वेस्टर्न डिस्टबर्न्स तसेच उत्तरेकडील वाऱ्यांमुळे तापमानात पुन्हा एकदा घट होण्याची शक्यता आहे.बुधवारी (ता. २०) यवतमाळ येथे ८.७ अंश सेल्सिअस तापमान नोंदले गेले असून, सरासरीपेक्षा ५.४ अंशांची घट झाली आहे. यवतमाळसह धुळे येथेही पारा ७.५ अंशांपर्यंत घसरल्याने थंडीच्या लाटेची परिस्थिती आहे. कोकणासह दक्षिणेकडील जिल्ह्यात किमान तापमान अद्यापही १५ अंशांच्या वरच आहे.

# पत्रकार संदीप काळे यांना 'रूपाली दुधगांवकर' राष्ट्रीय साहित्य पुरस्कार जाहीर

**ज्ञानेश्वर रोकडे । जिंतूर**

सुप्रसिद्ध लेखक, पत्रकार, निवेदक, संघटक संदीप काळे (मुंबई) यांना या वर्षीचा रूपाली दुधगांवकर राष्ट्रीय साहित्य पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे,अशी माहिती शिवार चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष, प्राचार्य डॉ. श्रीधर भोंबे यांनी रविवार २४ डिसेंबर रोजी जिंतूर येथील ज्ञानोपासक महविद्यालय येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.संदीप काळे हे नामवंत लेखक आहेत. त्यांचा जन्म १५ ऑगस्ट १९८२ ला नांदेड जिल्ह्यातील पाटनूर या गावात झाला संदीप काळे यांचे वडील रामराव काळे हे शेतकरी आहेत. त्यांच्या आई कमलबाई ऊर्फ मुक्ताबाई या गृहिणी आहेत. अनेक टीव्ही कार्यक्रमांचे संपादक म्हणून काम केलेले संदीप काळे आज राज्यातील आघाडीच्या दैनिकात संपादक म्हणून कार्यरत आहेत.आतापर्यंत मराठी, हिंदी आणि इंग्रजीतून संदीप काळे यांची ६७ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. मु. पो. आई, द्वेल्थफेल, ऑल इज वेल, प्रेमसेतू या चार पुस्तकांनी खपाचे सर्व विक्रमी रेकार्ड केले आहेत. ही चारही पुस्तके सर्व भाषांत आली असून अनेक विद्यापीठांच्या अभ्यासक्रमाला लागलेली आहेत.

वर्ल्ड रेकार्ड, इंडिया बुक रेकार्ड आणि लिमका बुक रेकार्डमध्ये संदीप काळे यांनी लिखाणाच्या माध्यमातून अनेक रेकार्ड केले आहेत. साहित्य, शासन, सामाजिक संस्था आणि पत्रकार संघातर्फे संदीप काळे यांना आतापर्यंत ३८० पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांनी आतापर्यंत एकूण २६ देशांचा अभ्यास दौरा केला आहे. अनेक पत्रकारिता महाविद्यालयांत त्यांनी प्राध्यापक




म्हणूनही सेवा बजावली आहे. काळे यांचा 'भ्रमंती लाईव्ह' हे सदर खूप लोकप्रिय आहे 'व्हॉईस ऑफ मीडिया' या देशातील नंबर एकच्या पत्रकार संघटनेचे संदीप काळे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. 'व्हॉईस ऑफ मीडिया मध्ये देशात सदत्तीस हजार पत्रकार सदस्य काम करतात. आज १९ देशांत 'व्हॉईस ऑफ मीडिया चे काम पोहचले आहे. पत्रकार संदीप काळे यांचे शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक कार्य लक्षात घेऊन, त्यांना रूपाली दुधगांवकर हा मागील २२ वर्षांपासून दिला जाणारा अत्यंत प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्काराचे स्वरूप २१ हजार रुपये रोख आणि असे आहे. त्रीसदस्यीय निवड समितीच्या टीमने संदीप काळे यांच्या नावाची एकमताने निवड केली. या पुरस्काराचे वितरण लवकरच मान्यवरांच्या हस्ते समारंभपूर्वक करण्यात येणार आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. श्रीधर भोंबे यांनी दिली. पत्रकार परिषदेला उप प्राचार्य प्रा. मुंजाजी दाभाडे, डॉ. विलास पाटील यांची उपस्थिती होती. आतापर्यंत कवयित्री अनुराधा पाटील, रंगनाथ पठारे, कवी भुजंग मेश्राम, शाम मनोहर, अरुण काळे, प्राचार्य भगवान देशमुख, जयराम खेडेकर, भ. मा. परसवाळे, संजीवनी लडेगावकर, डॉ. किशोर सानप, श्रीधर अंभोरे, सुचिता खल्लाळ, श्रीकांत देशमुख, विद्याधर म्हैसकर, इंद्रजित घुले, डॉ. पृथ्वीराज तौर, डॉ. प्रज्ञा दया पवार, मंगेश काळे, डॉ कविता मुरुमकर, डॉ. मीनाक्षी पाटील या मान्यवर सहित्यिकांना रूपाली दुधगांवकर' राष्ट्रीय साहित्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे.सदरील पत्रकार परिषदेस प्रा.पाडुरंग निळे, झाडं फाउंडेशन सदस्य गजानन वाघमारे यांची यावेळी उपस्थिती होती.

## पोलीस स्टेशन लोहा यांची कामगिरी चोरीच्या गुन्ह्यात फरार असलेले पाच आरोपी केले जेरबंद

**लोकनेता न्युज नेटवर्क**
**लोहा /विशाल घंटे**

लोहा पोलीस स्टेशन येथे दिनांक १७/१० / २३ रोजी रात्री चार ते सहा च्या दरम्यान बायपास ब्रिज लोहा शिवारा जवळ चोरी करण्यात आली होती. सदर चोरीच्या घटनेमध्ये एकूण ३४,५०० रुपयाचा मुद्देमाल चोरीस गेला होता. सदर गुन्ह्यातील एक आरोपी लोहा पोलिसांनी तात्काळ त्या दिवशी अटक केला होता.



मात्र त्यामधील इतर पाच आरोपी हे गुन्हा दाखल झाल्यामुळे व एका आरोपीस अटक केल्यामुळे फरार झालेले होते.सदर गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेणे कामी सहाय्यक फौजदार केंद्रे, पोना आनंद भाडेकर, पोलीस अमलदार रवी कुमार मडके यांचे पथक तयार करण्यात आले होते, सदर पथकाने आरोपीच्या मागे खबरी लावून त्यांच्या येण्या-जाण्यावर पाळत ठेवली होती.आज दि.२४/१२/२०२३ रोजी सदर आरोपी हे बस स्टॅन्ड येथे येणार असल्याची माहिती मिळाल्यावरून सदर आरोपीतांच्या विरोधात सापळा रचून त्यांना आज रोजी लोहा येथे अटक केली.आज रोजी आरोपींना अटक करून त्यांना माननीय न्यायालयामध्ये सादर करण्यात आले होते. या सर्व आरोपींना माननीय न्यायालयाने एमसिआर केल्यामुळे त्यांना आज रोजी नांदेड येथील जेलमध्ये दाखल करण्यात आले.सदरची कारवाई पोलीस निरीक्षक चिंचोलकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अमलदार रवी कुमार मडके यांच्या विशेष कामगिरीमुळे सहायक फौजदार केंद्रे, पोना भाडेकर, माधव डफडे दत्तात्रेय शेळके, मोरे यांनी केली.


## पोलिस निरीक्षक ओमकांत चिंचोलकरानी लोह्याच्या चौकातील अतिक्रमण केले जमीनदोस्त

**लोकनेता न्युज नेटवर्क**
**लोहा /विशाल घंटे**

लोहा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील एमएसइबी ऑफिस समोर गेल्या कित्येक वर्षापासून लोकांनी अतिक्रमण केले होते दि. २३ १२ २०२३ शनिवारी रोजी पोलीस बंदोबस्तात अतिक्रमण जमीनदोस्त करण्यात आले

शहरात अनेक वेळा लोकांनी याबद्दलची तक्रार एमएसइबी सार्वजनिक बांधकाम विभाग तहसील कार्यालय सगळीकडे तक्रार करून सुद्धा त्यांनी ही जमीन राष्ट्रीय महामार्गाकडे आम्ही वर्ग केली असल्याकारणाने आम्ही त्यावर कारवाई करू शकत नाहीत असे उत्तर देत पण उशिरा का होईना राष्ट्रीय महामार्ग अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी यांना आम्हाला रस्ता बनवण्यासाठी या अतिक्रमणाची अडचण होत आहे असे निदर्शनास आणून दिले या





तक्रारीवरून हे अतिक्रमण काढण्यास पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोळकर यांना जबाबदारी देण्यात आली त्यांनीही जमाबदारी अतिशय चोखपणे पोलीस बंदोबस्तात कुशलतेने पार पाडली आणि सदरील जागा क्रेन आणि बुलडोजर च्या साह्याने जमीन दोस्त करून राष्ट्रीय महामार्गाच्या स्वाधीन करण्यात आली यावेळी महसूल चे अधिकारी न.प. कार्यालयीन अधीक्षक उल्हास राठोड आणि लोहा शहरातील नागरिक उपस्थित होतेयादरम्यान छ.शिवाजी महाराज चौकात मॉब ड्रिल प्रशिक्षण घेण्यात आले. सर्व अंमलदार यांना ते कसे फायर करतात त्याची प्रॅक्टिस व्हावी याकरता सराव घेण्यात आला त्यादरम्यान १ हॅन्डग्रेनेट १ र्गिंप ग्रिनेड २गॅस सेल(श्रेपस रिपसश)व२ बुलेट हवेत फायर करण्यात आले

## इंदापूर तालुक्यातील निरगुडे गावच्या पोलीस पाटील पदी ऋषिकेश पवार

**लोकनेता न्यूज नेटवर्क । इंदापूर पुणे**

इंदापूर तालुक्यातील निरगुडे गावचे पोलीस पाटील पद हे रिक्त असल्याने नव्याने नेमणूक करण्यात आली यावेळी ही जागा अनुसूचित जमाती या प्रवर्गासाठी आरक्षित होती त्या प्रवर्गातून ऋषिकेश परमेश्वर पवार यांची परीक्षेतून निवड करण्यात आली.उपविभागीय दंडाधिकारी अधिकारी बारामती (प्रांत) श्री. वैभव नावडकर यांनी श्री ऋषिकेश परमेश्वर पवार,रा निरगुडे, ता इंदापुर जि. पुणे यांना इंदापुर तालुक्यातील निरगुडे या गावचे पोलीस पाटील म्हणून निवड करण्यात आली.



## सरकारची सकारात्मकता पाहता जरांगेंनी असा निर्णय घेऊ नये–फडणवीस

**मुंबई**–मराठा आरक्षणासंदर्भात सरकार सकारात्मकतेने काम करत आहे. सरकारची ही सकारात्मकता लक्षात घेता मनोज जरांगे यांनी उपोषणाचे निर्णय घेऊ नये असे आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. तसेच ओबीसी समाजावर अन्याय न करता मराठा समाजाला आरक्षण देण्याचे प्रयत्न सुरू असल्याचा पुनरुच्चारही देवेंद्र फडणवीस यांनी केला.पुढे फडणवीस म्हणाले की, ''मराठा आरक्षणासंदर्भात सरकार सकारात्मकतेने काम करत आहे. मुख्यमंत्री शिंदे स्वतः यात्रकरणी जातीने लक्ष देत आहेत. राज्य मागासवर्गीय आयोगाने वेगाने काम सुरु केले. तर शिंदे समितीचा दुसरा अहवाल आला असून तिसरा अहवालही येणे अपेक्षित आहे. त्यामुळे राज्य सरकारची सकारात्मकता पाहता जरांगे यांनीही असा निर्णय घेऊ नये'', असे फडणवीस म्हणाले.तसेच ओबीसी समाजावर अन्याय न करता मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी काम सुरू आहे. यासाठी फेब्रुवारीमध्ये विशेष अधिवेश बोलावण्यात आले असून यामध्ये तोडगा काढणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यापूर्वीच सांगितले.



**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स डे च्या निमित्ताने न्यायमूर्ती आर.व्ही.घुगे व न्यायमूर्ती वाय.एस.कोब्रागडे यांच्या हस्ते विधी सेवा पुरस्कार स्वीकारताना मुंबई उच्च न्यायालय संभाजीनगर खंडपीठाचे वकील संघाचे अध्यक्ष ड.नरसिंह जाधव (छाया:– लोकनेता न्युज नेटवर्क पाटोदा.)**

## प्रा.खेडेकर यांच्या वाढदिवसानिमित्त ब्लॅंकेट वाटप

**लोणार । लोकनेता न्यूज नेटवर्क**

प्रा.नरेन्द्रभाऊ खेडेकर यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी म्हणून बॅंकेटचे वाटप शिवसेना उबाठा चे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बशिरे (बच्छिरे) यांनी केले.

शहरातील भीम नगर परिसरात गरजवंत महिला भगिनींना सामाजिक बांधिलकी म्हणून प्रा.नरेंद्र खेडेकर शिवसेना उबाठा बुलढाणा जिल्हा संपर्कप्रमुख यांच्या वाढदिवसाच्या पूर्व संध्येला शिवसेना जिल्हा संघटक डॉ. गोपाल बशिरे (बच्छिरे) यांच्या वतीने लोकरीच्या ब्लॅंकेट चे वाटप करण्यात आले, सध्या स्थितीत कडाक्याची थंडी पडत आहे व अशा वेळेस



लोकरीचे ब्लॅंकेट मिळाल्याबद्दल गरजू महिला भगिनींनी श्री नरुभाऊ खेडेकर याच्यावर आशीर्वादाचा वर्षाव केला याप्रसंगी तालुकाप्रमुख एड दीपक मापारी, शहर प्रमुख गजानन जाधव सर, युवा शहर प्रमुख श्रीकांत मादनकर, सहसंघटक सुभाष पुरी, सुदानजी अंभोरे सर, तानाजी अंभोरे, किरण कमडे, अनिल पसरटे, अजय बछिरे, सुनील पसरटे यांच्या सह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

## वाणीचिंचाळे गावच्या तंटामुक्त अध्यक्षपदी शिवाजी केराप्पा कर्वे यांची बिनविरोध निवड



**लोकनेता न्यूज नेटवर्क**

वाणीचिंचाळे गाव हे तंटामुक्त गाव म्हणून संपूर्ण जिल्ह्यामध्ये ओळखले जाते गावामध्ये भांडण तंटा हा गावामध्येच मिटवला जातो.ग्रामपंचायत वाणीचिंचाळे मध्ये ग्रामसभा घेतली व ग्रामसभे मध्ये तंटामुक्त अध्यक्ष या पदाचा विषय होता त्या मध्ये शिवाजी कर्वे यांना सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली त्या वेळी राष्ट्रवादी पक्षाचे नेते मा.सरपंच लक्ष्मण निळे, मा.सरपंच बाबुराव सोपे, ग्रा.स.बंडू सोपे तसेच वाणीचिंचाळे गावचे सरपंच प्रियांका गडहिरे, ग्रामसेवक वाघ भाऊसाहेब, सोसायटी चे चेअरमन मोहन झाडबुके, युवा नेते गोरख येजगर, रघुनाथ गायकवाड, युवक नेते जितेंद्र गडहिरे,नामदेव घुणे ,भीमराव पाटील ,बापुदिन शेख तसेच सर्व ग्रामस्थ उपस्थित होते.सर्वांनी नवीन तंटामुक्त अध्यक्ष यांना सूभेच्या दिल्या.

# फौजदारी न्यायालयीन ऐतिहासिक बदलामुळे सर्व नागरिकांना कमी वेळेत न्याय मिळेल- प्रवीण दीक्षित माजी महासंचालक

**मुंबई । लोकनेता न्यूज नेटवर्क**

देशातील फौजदारी कायद्याच्या प्रणालीत केंद्राने अमुलाग्र बदल करून होणारे तीन महत्त्वाचे कायदे भारतीय न्याय संहिता २०२३, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३,व भारतीय साक्ष संहिता २०२३. नुकतेच संसदेत मंजूर झाले. त्यामुळे दीडशे वर्षा पूर्वीच्या जुन्या फौजदारी न्यायव्यवस्थेवर निमंत्रण ठेवणाऱ्या कायद्याचे प्रथमच बदल केल्यामुळे या फौजदारी न्यायालय ऐतिहासिक बदलामुळे सर्व भारतीय नागरिकांना कमी वेळेत न्याय मिळेल. अशी माहिती सह्याद्री वाहिनीवर माजी पोलीस महासंचालक प्रवीण दीक्षित यांनी दिली.

१८६० च्या दंड संहितेचा इंडियन पिनल कोड या ऐवजी आता भारतीय न्याय संहिता २०२३ केंद्राने अमलात आणल्याचे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी संसदेत केले. भारतीय न्यायव्यवस्थेत बलात्कार, सामूहिक बलात्कार,मुलानेच विरोधातील गुन्हे, हत्या करणे, अपहरन करणे अशा गुन्ह्याचा अधिक गांभीर्याने विचार करण्यात आला. राज द्रोहाचे कलम हटविण्यात आले ,तर देश द्रोहासाठी नवी तरतूद करण्यात आली. १८ वर्षाखालील महिलेवर बलात्कार केला तर जन्मठेप किंवा फाशीची शिक्षेची तरतूद करण्यात आली. तर सामूहिक बलात्कार या गुन्ह्यात मृत्यूपर्यंत करावासाची शिक्षा.एखाद्या गुन्ह्यातील गुन्हेगार हजर नसल्यास आरोपीला शिक्षा होऊन त्याची मालमत्ता जप्त करण्यात येणार अशा या तिन्ही कायद्यात बदल करण्यात आलेत. व या काय तरतुदी व त्याची वैशिष्ट्ये काय आहेत व त्याचा परिणाम न्यायप्रणालीत काय होईल हे सांगताना माझी पोलीस महासंचालक प्रवीण दीक्षित यांनी फौजदारी न्यायव्यवस्थेचा परिचय करून देताना म्हणाले की वैयक्तिक कायद्यासाठी दिवाणी कायदे असतात व ज्या फौजदारी कारवाया असतात त्यामध्ये प्रामुख्याने तीन कायदे असतात. हे तीनही कायदे रद्द होऊन आता त्यात बदल करण्यात आले. १) भारतीय न्याय संहिता २) भारतीय नागरिक सुरक्षा संहिता ३) भारतीय साक्ष संहिता. भारतीय न्याय संविधानात पूर्वी ५११ कलम होती .ती आता कमी करून ३५८ कलम केलेत व जवळ-जवळ १७५ कलमात बदल केलेत. यात २० नवीन गुन्ह्याची तरतूद केली. ९ कलम वाढवली. ३० गुन्ह्यात कमीत कमी शिक्षा ठेवली. व यात २२ कलम रद्द करण्यात आलेत. दुसरा कायदा भारतीय नागरिक सुरक्षा संरक्षण संहिता. यात पूर्वी ४८४ कलम होती तर आता त्यात वाढ करून ५३१ कलम जोडली. १७७ कलमात बदल करून ९ कलम वाढवण्यात आलेत व १४ कलम रद्द करण्यात आली. तिसरा जो महत्त्वाचा कायदा आहे तो म्हणजे भारतीय साक्ष संहिता. यात १६७ कलम होती तर आता १७० कलम झाली आहेत. यातील २४ कलमात बदल करण्यात आलेत. २ कलम वाढवण्यात आलेत व सहा कलम रद्द करण्यात आली. असे हे महत्त्वाचे बदल फौजदारी कायद्यातील आहेत. ब्रिटिश कालीन न्यायव्यवस्थेपेक्षा हे नवे कायदे कसे आहेत हे सांगताना प्रवीण दीक्षित म्हणाले इंग्रजांनी इंग्रजाचे राज्य कायम राहावं या उद्देशाने




१८५७ मध्ये कायदे तयार केलेत. हे कायदे त्यांनी त्यावेळेस केलेत त्यात काही बदल करून १८५७,१८६०,१८७२,१८९८ मध्ये वेगवेगळ्या वेळेस तयार केलेत. व ती लागू केली. त्यांचा उद्देश गुलामगिरी कायम ठेवण्याचा होता.व त्या दृष्टीने त्यांनी प्राधान्य देऊन ही कलमे अस्तित्वात आणली होती. इंग्लंडच्या राणी विरूद्ध कोणी देशद्रोह करू नये म्हणून देशद्रोहाचा कायदा होता . आता या नवीन तीन कायद्यामुळे लोकांना न्याय कसा मिळेल याकडे मोदी सरकारने विशेष लक्ष दिले. भारतासमोर दहशतवाद व गुन्हेगारी मोठे आव्हान असून यांचे विरुद्ध कठोर कारवाई कशी करता येईल याकडे प्राधान्याने लक्ष दिले आहे. सगळ्यात प्राधान्याने महिलांविरुद्धच्या गुन्ह्याला प्राधान्य देऊन महिला सुरक्षित राहण्याकडे लक्ष दिले. मातृ शक्तीचा सन्मान वाढला पाहिजे हे मोदी सरकारने बघितले .हे या नवीन कायद्याचे उद्दिष्ट आहे. १५० वर्षा तील त्रुटी नाहीसा केल्या. गुन्हेगार एखादा गुन्ह्या करून पळून गेला तरी तो न्यायालयात हजर नसतानाही न्यायालयाची प्रक्रिया पूर्ण करता येईल. उपस्थित पुराव्यानंतर तो दोशी आढळल्यास त्यास शिक्षा होईल व त्यास या शीक्षे विरोधात अपील करावयाचे असल्यास अपीलास त्यास समक्ष हजार राहावे लागेल. असे नवीन कायद्यात तरतूद आहे .यात आर्थिक गुन्ह्याचा पण समावेश आहे प्रामुख्याने दहशतवादाची व्याख्या केली. ते स्पष्ट करताना भारताने भारताचे सार्वभौमत्व, त्याची एकात्मता, भारताची सुरक्षा, आर्थिक सुरक्षा, भारताची अखंडता या कोणत्याही गोष्टीविरुद्ध कोणी वर्तन करत असेल तर त्या व्यक्तीविरुद्ध कठोर शिक्षेची तरतूद या नवीन संविधानात केलेली आहे. मागील कायद्यामुळे न्यायव्यवस्थेवर खूप परिणाम झाला होता. त्यात निकाल कित्येक वर्षे लागत नव्हते. तारीख पे तारीख असे होत होते .पोलीस कधी गुन्हा दाखल करतील , त्याचा तपास कधी हे समजत नव्हते याला कोणतीही कालमर्यादा नव्हती . भारताचा स्व आत्मा पुन्हा तेवत ठेवने हा उद्देश या नवीन कायद्याचा आहे. शहरात महिलांच्या गळ्यातील चेन हिस्कवने, मोबाईल पळवणे या गुन्ह्याकडे विशेष लक्ष दिले जात नव्हते. आता या गुन्ह्याला तीन वर्षाची शिक्षा सुनावण्यात आली. एखाद्या व्यक्तीने खोट्या नावाने लग्नाचे आमिष दाखवून शरीर संबंध ठेवले असतील तर त्या व्यक्तीला कठोर शिक्षा ठेवलेली आहे .असे आमूलाग्र बदल करण्यात आले आहेत. मात्र या बदल केलेल्या कायद्याचे प्रशिक्षण देणे पण आवश्यक आहे. त्याचबरोबर पोलीस व न्यायाधीशांची संख्या वाढवणे तितकेच जरुरी आहे. असे माजी पोलीस महासंचालक प्रवीण दीक्षित यांनी सह्याद्री वाहिनीवर दिलेल्या मुलाखतीत सांगितले.

# तहसिलकार्यात ग्राहक दिन साजरा

## ग्राहकांनी नेहमी अत्यंत जागरूक राहणे आवश्यक–ॲड.विलासराव देवसरकर

**लोकनेता नेटवर्क न्यूज**
**उमरखेड(सय्यदरहीम रजा )**

ग्राहकांनी नेहमी कोणत्याही प्रकारच्या वस्तू खरेदी करताना अत्यंत जागरूकपणे राहणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन अ.भा. ग्राहक पंचायत चे तालुका अध्यक्ष ऍन्ड विलासराव देवसरकर यांनी केले ऍन्ड विलासराव देवसरकर हे स्थानिक तहसिल कार्यालयाच्या वतीने आयोजित केलेल्या राष्ट्रीय ग्राहक दिन कार्यक्रमात अध्यक्ष स्थानावरून बोलत होते यावेळी व्यासपीठावर नायब तहसिलदार प्रशांत कावरे प्रमुख म्हणून तर ग्राहक पंचायत चे पदाधिकारी प्रा. प्रकाश देशमुख अमोल गव्हाणे दत्ता गंगासागर माजी ग वी अ सुभाष पांडे, ॲड. राजेश्वर रायवार, सविता पाचकोरे ,भारत कुलकर्णी ' राजेश गांजेगावकर हे ग्राहक पंचायत चे पदाधिकारी उपस्थित होते. हा कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी मान्यवरांच्या हस्ते सर्वप्रथम जागो ग्राहक जागो असे कवितेचे वाचन मुटकुळे यांनी केले पुढे ॲड. देवसरकर म्हणाले की ग्राहकांनी आपली फसवणूक होऊ नये यासाठी दक्ष असले पाहिजे काही तक्रार करावयाची असल्यास स्थानिक ग्राहक पंचायत सदैव तयार असल्याचे सांगून ग्राहकांनी जागृत असल्यास न्याय मिळतोच असेही ते म्हणाले ग्राहकांच्या अनेक ठिकाणी फसवणूक होते. परंतु आपण मात्र जाऊ द्या असे म्हणून सहानुभूती दाखवतो व तक्रार करणे टाळतो त्यामुळे अनेक वेळा स्वतःचे नुकसान होते. तेव्हा ग्राहकांनी तक्रार करून न्याय मिळवून घ्यावा सर्वसामान्य माणसाला न्याय कसा मिळेल त्यांच्यावर होणारा अन्याय कसा दूर करता येईल यासाठी ग्राहक पंचायत सदैव प्रयत्न करत असल्याचे त्यांनी सांगितले यावेळी अमोल गव्हाणे यांनी प्रास्ताविकात ग्राहक पंचायत चे कार्य तसेच ग्राहकांच्या अधिकार याबाबत माहिती दिली तर प्रा. प्रकाश देशमुख यांनी शासनाने सुद्धा जागो ग्राहक जागो चा नारा दिला असून सन १९८६ यावर्षी हा कायदा करण्यात आला असून त्यामध्ये कायद्यात शिक्षेची तरतूद नसल्यामुळे त्यानंतर नऊ ऑगस्ट २०१९रोजी




शिक्षेच्या तरतुदीसह कायदा करण्यात येऊन पुढे २०जुलै२०२०रोजी हा कायदा अमलात आल्याची त्यांनी सांगितले. तर माजी गट विकास अधिकारी सुभाष पांडे यांनी या कायद्यान्वये अनेक ठिकाणी ग्राहकांच्या वतीने झालेले निर्णय याबाबत चे न्यायनिवाडेच वाचून दाखवले तर दत्ता गंगासागर यांनी स्वतः ग्राहक असल्यामुळे त्यांनी सुद्धा काही वस्तूची खरेदी केल्या होत्या त्या वस्तू निकृष्ट दर्जाच्या असल्याने त्याबाबतची तक्रार करून न्याय मिळवून घेतले असल्याचे सांगितले. यावेळी उपस्थित असणाऱ्या व्यक्तींनी सातबाराचे उतारे भूमी अभिलेख मधील नकाशा तसेच स्टँप घेताना दहा टक्के रक्कम आगाऊ घेतली जाते. या बाबतच्या तक्रारी केल्या तर दहा टक्के रक्कम घेत असल्याबाबत स्टॅम्प पेपर घेताना दहा टक्के अतिरिक्त रक्कम घेतल्या जात असल्याबाबत ग्राहक पंचायत च्या वतीने ॲड.विलासराव देवसरकर यांनी नायब तहसिलदार प्रशांत कावरे यांना यावेळी निवेदन देण्यात आले ग्राहक पंचायत च्या वतीने हे ग्राहकांचे शोषण आहे. त्यामुळे त्यांच्यावर कार्यवाही करावी असेही त्यांनी यावेळी सांगुन हे ग्राहकांचे शोषण थांबवावे असेही ते म्हणाले कार्यक्रमाचे संचालन संदीप घाडगे यांनी तर आभार प्रदर्शन नायब तहसिलदार प्रशांत कावरे यांनी केले.

# स्वामी विवेकानंद पब्लिक स्कूल मध्ये तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन संपन्न

**लोकनेता नेटवर्क न्यूज**
**उमरखेड (सय्यद रहीम रजा )**

शिक्षण विभाग पंचायत समिती उमरखेड व स्वामी विवेकानंद पब्लिक स्कूल हरदडा यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २१ व २२ डिसेंबर २०२३ रोजी तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन स्वामी विवेकानंद पब्लिक स्कूल हरदडा येथे करण्यात आले होते. सदर विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन ड. संतोष जैन यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अध्यक्ष स्थानी स्वामी विवेकानंद पब्लिक स्कूल हरदडा चे अध्यक्ष डॉ नरेश गंदेवार, प्रमुख पाहुणे म्हणून सचिव विजय जयस्वाल, शाळेचे प्राचार्य मैत्रेय देशमुख आदि उपस्थित होते. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होऊन त्यांच्या कला गुणांचे प्रदर्शन व्हावे हा हेतू डोळ्यासमोर ठेवून दरवर्षी शिक्षण विभागाद्वारे विज्ञान प्रदर्शन आयोजित केले जाते.

यावर्षीचे आयोजन हे स्वामी विवेकानंद पब्लिक स्कूल हरदडा येथे करण्यात आले होते.

विज्ञान समाजासाठी' हा यावर्षी चा थीम असून तालुक्यातील एकूण ९४ शाळांनी यात सहभाग नोंदविला होता.

यात एकुण तीन गट होते. यामध्ये सामान्य गट, आदिवासी गट व शिक्षक गट यांचे वेग वेगळे प्रकल्प होते. यामध्ये सामान्य गटातून उच्च प्राथमिक वर्ग ६ ते ८ मध्ये प्रथम क्रमांक मॉडर्न पब्लिक स्कूल उमरखेड ची विद्यार्थिनी कु. विभावरी देवसरकर हिचा आला असुन द्वितीय गुरुदेव गोरोबा विद्यामंदिर उमरखेड चा विद्यार्थी शेख आहान तर तृतीय क्रमांक ज्ञानज्योती



इंग्लिश मिडीयम स्कूल ढाणकी चा विद्यार्थी सत्यम कोठारी यांनी मिळवलं आहे. सामान्य गट ( माध्यमिक, उच्च माध्यमिक वर्ग ९ ते १२ मध्ये) प्रथम क्रमांक महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय, उमरखेड चा विद्यार्थी सोहम नी. जाधव, द्वितीय क्रमांक स्वामी विवेकानंद पब्लिक स्कूल हरदडा ची विद्यार्थिनी कु. युगा देशमुख, तर तृतीय क्रमांक स्वामी पेंडसे गुरुजी विद्यालय, ढाणकी चा विद्यार्थी हर्षद जी. मोटाळे मिळवला आहे.

आदिवासी गटातून सुद्धा विद्यार्थ्यांचे प्रकल्प होते. यामध्ये आदिवासी गट ( प्राथमिक ६ ते ८ व माध्यमिक व उच्च माध्यमिक गट ९ ते १२) या दोन्ही गटात दयानंद सरस्वती विद्यालय, निंगणुर या शाळेच्या दोन्ही विद्यार्थ्यांनी अनुक्रमे कुलदीप सिंह शेखावत व काजल जाधव आदींनी वेग वेगळ्या गटातून प्रथम क्रमांक प्राप्त केले.

शिक्षक गट ( उच्च प्राथमिक) मधून जिल्हा परिषद

**गट शिक्षण अधिकारी सतिष दर्शनवाड यांनी विज्ञान प्रदर्शनाला भेट देऊन विद्यार्थ्यांनी बनवलेल्या प्रत्येक प्रकल्पाची पाहणी केली. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी प्रश्न विचारत संवाद देखील साधला.**

मुलांची शाळा, उमरखेड च्या शिक्षिका प्रियंका वानखेडे यांनी प्रथम क्रमांक मिळविला तर उच्च माध्यमिक गटातून मॉडर्न पब्लिक स्कूल उमरखेड चे शिक्षक प्रदीप धोबे यांनी सुद्धा प्रथम क्रमांक पटकावला. उद्घानप्रसंगी संचलन प्रशांत मटपल्लेवार यांनी केले तर आभार ज्ञानेश्र्वर खांडरे यांनी मानले.

## लिंबागणेश परीसरात वराहांकडुन शेतपिकांचे नुकसान; वनविभाग झोपेत, संरक्षणासाठी रंगीबेरंगी साड्या आणि मळा:– डॉ.ढवळे



**लोकनेता न्युज नेटवर्क**
**पाटोदा/प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश परीसरातील शेतकऱ्यांना विविध नैसर्गिक संकटांना समोरे जावे लागत असुन संकटाची मालिका सुरूच असुन आता शेतकऱ्यांना वन प्राण्यांच्या हैदोसाला सामोरे जावे लागत असुन शेतातील पिके उद्धस्त होत असुन हातातोंडाशी आलेला घास हिरावला जात असुन शेतकरी हवालदिल झाले आहेत.मात्र वनविभागाकडुन या कडे दुर्लक्ष होत असल्याने वनविभाग गाढ झोपेत असल्याची संतप्त भावना शेतकऱ्यांमधुन उमटत आहे. शेतकरी संरक्षणासाठी रंगीबेरंगी साड्या तर हल्ल्यापासून संरक्षणासाठी मळा करून रात्री जागून काढत आहेत. संबधित प्रकरणी उपाय योजना करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी बीड काकडे यांना केली आहे.बीड तालुक्यातील बालाघाटा वरील लिंबागणेश पंचक्रोशीतील डोंगराळ भागातील पोखरी (घाट), पिंपरी, बेलगाव, फुकेवाडी, सोमनाथवाडी आदी परीसरातील शेत शिवारात संचार करणाऱ्या वराहांनी धुमाकूळ घातला असुन झुंडीच्या झुंडी शेतातील उभ्या पिकांची नासाडी करत आहेत. संरक्षणासाठी शेतकऱ्यांकडुन रंगीबेरंगी साड्यांचा वापर आणि हल्ल्यापासून संरक्षणासाठी मळा वापर करण्यात येत आहे. शेतातील ज्वारी, भुईमूग, बटाटा आदी उगवलेल्या पिकांची डुकरांकडुन खाण्यापेक्षा नासधूस जास्त करत असल्याने प्रतिबंधात्मक उपाय म्हणून रानडुकरे घाबरतात म्हणून रंगीबेरंगी साड्यांचे कुंपन करण्यात येत असुन रानडुकराच्या हल्ल्यापासून संरक्षण म्हणून शेतावर राखण करणाऱ्या शेतकऱ्यांना उंचावर 'मळा' करून रहावे लागते आहे. या कडे वनविभागातील आधिकाऱ्यांनी गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे मत सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केले आहे.वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामध्ये तसेच पिकांचे नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी वनविभागाची असताना वनविभाग मात्र गाढ झोपेत असुन शेतकऱ्यांच्या नुकसानीचे त्यांना गांभीर्य दिसुन येत नाही. संबधित प्रकरणी उपाययोजना करण्यात याव्यात अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी बीड वैभव काकडे यांना केली आहे.

## श्री बजरंगबली वेताळ मंदिरात उद्या सोमवारी श्री दत्त जन्मोत्सवाचे आयोजन

### भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे–प.पू.श्री विलासानंदजी महाराज

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**परळी,विजय रोडे**

श्री बजरंगबली वेताळ मंदिर येथे उद्या सोमवार दि.२५ डिसेंबर २०२३ रोजी श्री दत्त जन्मोत्सव सोहळयाचे भव्य दिव्य आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमास भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संयोजक प.पू.श्री विलासानंदजी महाराज यांनी केले आहे. शहरातील ज्योतिर्लिंग श्री वैद्यनाथ मंदिर परिसरात असलेल्या श्री बजरंगबली वेताळ मंदिरात श्री दत्त जन्मोत्सवानिमित्त दि.२५ डिसेंबर रोजी प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी विविध धार्मीक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार दि.१८ डिसेंबरपासून श्री दत्त पारायण होणार असून २५ डिसेंबर रोजी दुपारी १२ वा.



महाआरती होणार असून यानंतर दुपारी १ ते ५ वा. महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या सर्व धार्मीक कार्यक्रमास परळी शहर व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन श्री बजरंगबली वेताळ मंदिर च्य वतीने संयोजक प.पू.श्री विलासानंदजी महाराज यांनी केले आहे.

## लोकनेते आमदार सुरेश धस यांच्या वाढदिवसा निमित्त दिलेला शब्द श्रीहरी गिते यांनी पाळला

### गरीब कुटुंबीयांना आर्थिक मदत करत घर दिले बांधुन

**लोकनेता न्युज नेटवर्क**
**पाटोदा/शेख महेशर ताहेर**

पाटोदा नगर पंचायतचे कर्तव्यदक्ष सभापती श्रीहरी गिते पाटील यांनी शहरातील वार्ड क्रमांक-१७ क्रांतीनगर भागातील एका गरीब, धुणे भांडी करून घर प्रपंच चालविणाऱ्या कुटुंबाला स्वखर्चाने व नगर पंचायत अंतर्गत घरकुल मंजूर करून घेत घर बांधून दिले आहे. या विषयी अधिक माहिती अशी की हिराबाई पिंपळे व त्यांचा मुलगा ज्ञानेश्वर पिंपळे हे मोलमजुरी व धुणे भांडी करून जगणारे गरीब कुटुंब, परिस्थिती नाजूक असल्यामुळे त्यांना घरकुल मंजूर होऊन ही घराचे बांधकाम करणे शक्य होत नव्हते. हि बाब पाटोदा नगर पंचायतचे सभापती श्रीहरी गिते पाटील(बापू) यांच्या



लक्षात आली. या नंतर त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन सर्व घराचा खर्च व जबाबदारी स्वतःवर घेऊन एक आदर्श घालून देत या गरीब कुटुंबाला घर उपलब्ध करून दिले स्वतः उभे राहुन घराचे बांधकाम पूर्ण करून घेतले. अतिशय कौतुकाची व विषेश बाब म्हणजे श्रीहरी गिते पाटील हे नेहमीच आगळे वेगळे व सामाजिक कार्य करत असतात. हे कार्य करीत असताना या वेळी त्यांनी ०२/०२/२०२४ म्हणजे विधान परिषद सदस्य आमदार सुरेश(आण्णा)धस यांच्या वाढदिवसा निमित्त हे घर पुर्ण करून या कुटुंबाला राहण्यासाठी उपलब्ध करून देण्याचा शब्द दिला होता, आणी तो शब्द त्यानी पाळला आहे. या घराचे बांधकाम पुर्ण झालेले असुन प्लास्टरचे व फरशीचे काम सुरू असून येत्या काही दिवसात हे काम पुर्ण होऊन हे कुटुंब या नवीन घरात राहायला जाईल. सभापती श्रीहरी गिते पाटील यांनी या केलेल्या कार्याबद्दल यांचे प्रभागातील व तालुक्यातील सर्वच मान्यवराकडून व लोकनेते आ.सुरेश(आण्णा)मित्र मंडळ, श्रीहरी गिते पाटील मित्र मंडळ व पाटोदा तालुक्यातील नागरिकांकडून कौतुक होत आहे.



**आज मंठा शिवसेना संपर्क कार्यालय येथे काही नियुक्ती करण्यात आल्या त्यामध्ये महिला आघाडी तालुका प्रमुख पदी इंदुमती लहाने, उपतालुकाप्रमुख सविता गवळी, महिला आघाडी शहर प्रमुख पदी संगीता ताई खराबे, उपशहर प्रमुख मीराताई सरकटे, व शिवसेना उप तालुका प्रमुख पदी रामराव वरकड, यांची व खोडारसावंगी सर्कल उपप्रमुख पदी तुकाराम आकात, या सर्व नियुक्त्या करण्यात करण्यात आल्या व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे ,दलित आघाडी तालुकाप्रमुख दिलीपराव हिवाळे, शिवसेना उपशहर प्रमुख दत्तात्रय बोराडे, सुनील गुंड, रामभाऊ ताटे,**

## चारठाणा ते शिवाजी जवळा दिंडी उत्साहात पार पडली

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**चारठाणा(श्रीपाद जोशी)**

प्रथेप्रमाणे व तसेच नवसाप्रमाणे श्रीक्षेत्र जिवाजी जवळा येथे चारठाणा येथील महिला मंडळ व पुरुष मंडळी अशा भक्तगणांनी चारठाणा ते जिवाजी जवळा पर्यंतचा २० किलोमीटर प्रवास करून उत्साहात दिंडी पार पाडली दिंडीची सुरुवात बजरंग बली याच्या आरतीने करून या दिंडीमध्ये भजन गवळणी ढोल ताशे आशा उत्साहामध्ये भंडारा उधळत आरसड मार्गे खैरी नागठाणा जिवाजी जवळा पर्यंतचा बेल भंडारा उधळीत मल्हारीचा जयघोष करीत पायी प्रवास केला या दिंडीमध्ये दिंडी चालक शिवाजी देशपांडे. इतर भक्तगण



हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४
This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904